चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र
कार्यालय पोलीस अधीक्षक, चंद्रपूर
Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in
०३ जुन, २०१९
☎ : 07172-264300
: 07172-255800
: 7276494810 (PRO)

# स्थानिक गुन्हे शाखेनी केला मोबाईल चोरीचा गुन्हा उघड ०७ मोबाईलस आरोपी जेरबंद

दिनांक ०१/०६/२०१९ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस पथक चंद्रपुर शहर परिसरात पेट्रोलींग करीत असतांना गोपनीय माहिती मिळाली की, अटल गुन्हेगार आरोपी नामे अतुल विकास राणा वय २३ रा. गंजवार्ड चंद्रपुर हा चंद्रपुर शहर परिसरात संशयीत रित्या काहीतरी गुन्हा करण्याच्या उद्देशाने फिरत आहे. अशा मिळालेल्या माहितीवरून स्थागुशा पथकाने त्यास ताब्यात घेवुन विचारपुस करून त्याची झडती घेतली असता त्याचे जवळ पोलीस स्टेशन चंद्रपुर शहर येथील अप.क्र. ४३४/२०१९ कलम ३८० भादंविच्या गुन्हयातील एकुण ०४ मोबाईल फोन आणि इतर ०३ असे एकुण ०७ मोबाईल फोन जप्त करण्यात आले आहे. आरोपी नामे अतुल विकास राणा वय २३ रा. गंजवार्ड चंद्रपुर याची कसुन चौकशी केली असता त्याने सदरचे मोबाईल फोन हे परिचारीका प्रशिक्षण केंद्र चंद्रपुर येथुन चोरी केल्याची कबुली दिल्याने त्यास अटक करण्यात आली आहे. पुढिल तपास स्थागुशा पथक करीत आहे.

सदरची कार्यवाही पोलीस अधीक्षक श्री. महेश्वर रेड्डी यांचे मार्गदर्शनात, स्थागुशा प्रभारी पोनि. श्री. ओ.जी. कोकाटे, यांचे नेतृत्वात पोउपनि जावेद शेख, दौलत चालखुरे, पद्माकर भोयर, पोहवा. महेंद्र भुजाडे, पोशि प्रफुल मेश्राम, कुंदन बावरी हे करीत आहे.

---

☎ : 07172-264300
: 07172-255800
Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in
: 7276494810 (PRO)

# स्थानिक गुन्हे शाखा, चंद्रपूर यांची अवैध्द दारु तस्करांवर धडक कारवाही. एकुण ५२ लाख रुपयाचा दारुसाठा जप्त.

दिनांक ०३/०६/२०१९ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाने विशेष मोहीम राबवुन एकाच रात्री ०३ आरोपी ०५ चारचाकी वाहनासह **एकुण ५२ लक्ष २० हजाराचा** मुद्देमाल जप्त करण्यात यश आले आहे.

१) दि.०३/०६/१९ रोजी रात्रो दरम्यान गोपनीय माहितीवरून, डि.एड कॉलेज बाबुपेठ हुडको कॉलनी मागे टाटा ४०७ क्र एम.एच.०२/३०८१ मध्ये अवैद्य देशी दारु आणुन मंहिद्रा बुलेरो पिकअप क्र एम.एच.३४ ए.बी.८९२२ दारुचा साठा भरत असल्याच्या माहिती वरुन सदर ठिकाणी धाड टाकली असता टाटा ४०७ क्र एम.एच. ०२/३०८१ मध्ये मागच्या डाल्यात देशी दारुच्या ९० पेटया व मंहिद्रा बुलेरो पिकअप क्र एम.एच.३४ ए.बी.८९२२ मध्ये मागच्या डाल्यात देशी दारुच्या ४७ पेटया असे एकूण १३७ देशी दारुचे पेटया व दोन्ही वाहन असा एकूण एकूण २५,७०,०००/—रु चा मुद्देमाल जप्त करण्यात आले.

२)दुसरीकडे मिळालेल्या गोपनीय माहितीवरून मुल चंद्रपूर रोडवर घंटा चौकीसमोर नाकेबंदी करुन एक इंडिगो कार क्र एम.एच.३४ के ३०७० तपासणी केली असता वाहनाच्या डिक्कीत सहा प्लास्टीक बोरीत देशी दारुच्या २,००० निपा. व वाहन असा एकूण ६,००,०००/—चा माल घटनास्थळी जप्त करण्यात आला असुन दोन आरोपीस अटक करण्यात आली आहे.

३) तिसरी कडे चंद्रपुर येथील नेहरू चौक येथे नाकेबंदी दरम्यान एक होन्डासिटी कार क्र एम.एच.०२ बी.डि. ३०४० ची तपासणी केली असता वाहनात देशी दारुने भरलेल्या सिलबंद १५ पेटया कि. १,५०,०००/—रु व होंडासिटी कार क्र एम.एच.०२ बि.डी ३०४० कि. ७,००,०००/—रु असा एकूण ८,५०,०००/—रु चा माल जप्त करण्यात आला.

४) चौथ्या कारवाईत भवनाजी बाई शाळे समोर मुल रोडवर सापळा रचुन नाकेबंदी दरम्यान एका महिंद्रा पिक अप क्र एम.एच. ३३ टी ०४९० ची पोलीस पथकाने तपासणी केली असता वाहनात मुरमाच्या पोत्या खाली ७० देशी दारुच्या पेटया कि. ७,००,०००/—रु चे मिळून आल्याने पोलीसांनी बुलेरो पिक कि.५,००,०००/—रु असा एकूण १२,००,०००/—रु चा माल जप्त केला.

सदरची कार्यवाही पोलीस अधीक्षक श्री. महेश्वर रेड्डी यांचे मार्गदर्शनात, स्थागुशा प्रभारी पोनि. श्री. ओ.जी. कोकाटे, यांचे नेतृत्वात पोउपनि जावेद शेख यांच्या सह सफौ/संगीडवार, सफौ पंडीत वऱ्हाटे, सफौ/नितीन जाधव नापोशि अविनाश दशंमवार, नापोशि मिलींद चव्हान, नापोशि. जमीर पठाण, नापोशि. गजानन नागरे,

नापोशि. संजय आतकुलवार, नापोशि. अनुप डांगे, नापोशि. नईम खान पोशि अमजद खान, पोशि मयुर यांनी पार पाडली.

---